# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २१५-२२** **दिनांक १६/०७/२०२२**

## पोलीसांनी आयोजित केलेल्या शिबीरामध्ये १५७ जणांनी केले रक्तदान.

मिरा-भाईंदर,वसई-विरार मधील रक्तपेढयांमध्ये सध्या रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने रुग्णांकरिता रक्त मिळविण्यासाठी फार अडचणी येत असल्याबाबत व विविध संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या रक्तदान शिबीरांच्या आयोजनाची गती मंदावल्याने रक्ताची फार टंचाई निर्माण झाल्याबाबत विविध वर्तमान पत्रांमध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. तसेच काहि प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांना व्हॉट्सॲपद्वारे संदेश पाठवून सदर परिस्थितीबाबत माहिती दिली होती. सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेवून जास्तीत जास्त रक्तदात्यांना प्रोत्साहित करुन पोलीस विभागाचे मार्फतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आवाहन केले होते.

त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील श्री संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ वसई यांनी वालीव पोलीस ठाणे हद्दीमध्ये उडपी हॉटेल हॉल, रेंजनाका गोखिवरे, वसई पुर्व येथे दिनांक १५/७/२०२२ रोजी वालीव पोलीस ठाणे व सरला ब्लड बँक यांचे सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. सदर रक्तदान शिबीरामध्ये पोलीस अधिकारी/अंमलदार, महाराष्ट्र सुरक्षा पथकाचे जवान, पोलीस मित्र तसेच मोहल्ला कमिटीच्या सदस्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवून एकुण १५७ रक्तदात्यांनी रक्तदान करुन सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला आहे.

सदर रक्तदान शिबीरादरम्यान श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री पंकज शिरसाठ, सहा. पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस स्टेशनचे पोलीस

निरीक्षक श्री राहूलकुमार पाटील, आचोळे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत सरोदे व इतर पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच पोलीस मित्र व मोहल्ला कमिटीचे सदस्य उपस्थित होते.




